REGISTERED No. B. 3434

**अर्थ**

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार,
इत्यादि विषयांस वाहिलेलें साप्ताहिक.

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.

*वर्गणीचे दर :*

वार्षिक : ६ रु. महामाही : ३ रु.

किरकोळ अंक : २ आ.

*जाहिरातीचे दर :*

कळविण्याचे व इतर सर्व जाहिरातवाल्याकडून मागवावयास.
चेक, मनिऑर्डरी, इ. पाठविण्याचा पत्ता:–

" अर्थ "
" दुर्गाधिवास " पुणें ४.

# अर्थ

*" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*

वर्ष १६ पुणें, बुधवार तारीख ३१ मे, १९५० अंक २२


## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि०,
**पुणें २.**

## काकासाहेब खाडिलकर

**म्हणतात**

★ प्रथम " धैर्यधर " नंतर " लक्ष्मीधर " ★

**कारखाना उभा करण्याकरिता**
**" धैर्यधर " शेअर घेतील व ठेवी देतील**

**नफ्याला सुरुवात झाल्यानंतर**
**" लक्ष्मीधर " शेअर घेतील व ठेवी देतील**

★ ★ " धैर्यधर" मिळाले म्हणून ★ ★
छत्तीस लक्ष रुपयांची मशिनरी आली

**उभारणीकरितां " धैर्यधर " मिळत आहेत**

**– शेअर–विक्री सुरूं आहे –**

## मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

दि. २१ मे १९५०.
९८०, सदाशिव पेठ,
कॉमनवेल्थ बिल्डिंग,
लक्ष्मी रोड, पुणें २.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एलएल. बी.
सी. जी. आगाशे ॲण्ड को.,
मॅनेजिंग एजंटस्.

**पांच हॉर्स पावरचें**
**डिझेल एंजीन**
घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच ! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.
**केळकर बंधू, लक्ष्मी रोड, पुणें शहर.**

## विविध माहिती

**सुक्या फळांची आयात**—१९४९-५० सालीं अफगाणिस्थानांतून भारतांत ५,८८४ टन सुक्या फळांची आयात झाली. ह्या फळांची किंमत १,३१,०१,९५२ रुपये होती. त्याच सालीं अफगाणिस्थाननें भारताकडून २७,८५,५०० पौंड चहा आयात केला. त्याची किंमत २,४५,६९,२०४ रुपये होती. अफगाणिस्थानांतून आयात केलेल्या मालाची एकूण किंमत १,८८,४१,१६१ रुपये भरली आणि निर्यात केलेल्या मालाची किंमत ३५,२५, १६७ रुपये भरली.

**विद्यार्थी आत्महत्या कां करतात ?**—ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या उपकुलगुरूंनीं असा अभिप्राय व्यक्त केला आहे कीं ब्रिटनमधील इतर कोणत्याही वर्गातील लोकांपेक्षां विद्यापीठांत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांत आत्महत्येचें प्रमाण आधिक आहे. ह्या वस्तुस्थितीच्या कारणाचें निदान करतांना त्यांनीं असें सांगितलें कीं बहुतेक विद्यार्थ्यांना कांहीं तरी व्यक्तिगत चिंतेनें ग्रासलेलें असतें.

**ग्रामीण जीवनाची आंकडेवार माहिती**—हिंदुस्थानच्या ६० लाख खेड्यांत २० कोटींपेक्षां अधिक लोक रहातात. ह्या ग्रामीण जनतेच्या आर्थिक परिस्थितीची आंकडेवार माहिती भारत सरकार तज्ज्ञ आंकडेशास्त्रज्ञांकडून गोळा करविणार आहे. ह्यासंबंधीं एक आराखडा तयार करण्यांत आलेला असून त्याप्रमाणें एका महिन्यांत प्रत्यक्ष कामाला प्रारंभ होईल. ह्या कामासाठीं २५ लाख रुपये खर्च करण्याचें ठरविण्यांत आलें आहे.

**भारत-पाकिस्तान व्यापार**—मार्च १९५० मध्यें प. पाकिस्तान आणि अफगाणिस्तान ह्या देशांना भारतानें ४[illegible]·४७ लाख रुपयांचा माल निर्यात केला. उलटपक्षीं भारतानें वरील दोन देशांकडून २३·१३ लाख रुपयांचा माल आयात केला.

**शेतकी कॉलेजचें भवितव्य**—१९४७ सालीं दिल्ली येथें सुरू करण्यांत आलेलें सेंट्रल कॉलेज ऑफ ॲग्रिकल्चर बंद पडणार असा रंग दिसत आहे. जुलै १९५० पासून सुरू होणाऱ्या नव्या वर्षासाठीं विद्यार्थ्यांचीं नांवें नोंदण्याचें बंद करण्यांत आलें आहे. हें कॉलेज सध्यांच्या विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत म्हणजे निदान ३ वर्षे तरी चालू ठेवण्यांत येईल असें आश्वासन भारतीय संसदेंत सरकारतर्फे देण्यांत आलें होतें. सरकारच्या काटकसरीच्या धोरणाची कुऱ्हाड कॉलेजवर पडणार असें दिसतें. अजून निश्चित निर्णय घेण्यांत आलेला नाहीं.

**डॉक्टरांचा तुटवडा**—सिलोनमध्यें डॉक्टरांचा अतिशय तुटवडा भासत आहे. परीक्षा उत्तीर्ण झालेल्या कोणत्याहि डॉक्टरास तात्काळ सरकारी नोकरी मिळूं शकते.

**रशियांत चहाची वाढती लागवड**—रशियाच्या मध्यवर्ती शास्त्रीय संशोधन संस्थेनें देशांत चहाची लागवड आणखी कोठें करतां येईल ह्यासंबंधीं संशोधन चालविलें आहे. कझकस्तान आणि किरगिझिया ह्या उपराज्यांतून चहाचे प्रायोगिक मळे लावण्यांत येत आहेत. आझरबैजन ह्या भागांत चहाच्या मळ्यांना अनुकूल परिस्थिति आहे असें आढळून आलें आहे. त्याशिवाय रशियाचा अतिपूर्वेकडील पॅसिफिकचा किनाराही चहाच्या लागवडीखालीं आणण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत.

**कुलपांचा सरकारी कारखाना**—अलिगड मेटल वर्किंग स्कूलचें रूपांतर कारखान्यांत करण्याचें संयुक्तप्रांत सरकारनें ठरविलें आहे. ह्या कारखान्यांत कुलपांना लागणारे सुटे भाग तयार करण्यांत येणार आहेत. अलिगडमधील कुलपें तयार करण्याचे कारखाने ग्रामोद्योगाच्या धर्तीवर आहेत. आशिआ खंडातील कुलपांचा हा सर्वांत मोठा उद्योगधंदा आहे असें म्हणतात. कारखान्यांत तयार होणारे सुटे भाग एका सहकारी संस्थेच्या हवालीं करण्यांत येतील. ह्या संस्थेचे ४,००० सभासद आहेत. सहकारी संस्था हे भाग कामगारांना वाटून देईल व कामगार त्यांचा उपयोग करून कुलपें तयार करतील.

**सतरंज्या डॉलर्स मिळवतात**—भारतांत तयार होणाऱ्या सतरंज्या आणि गालिचे अमेरिकेला पाठवून दरवर्षी सुमारें १० लाख डॉलर्सची प्राप्ति होते. भारतांतून फक्त दोन प्रकारच्या सतरंज्या निर्यात होतात. भारताशिवाय इराण, चीन आणि पाकिस्तान हे देशही सतरंज्या निर्यात करतात. १९४८-४९ सालीं भारतानें ५,५९,००० पौंड वजनाच्या सतरंज्या अमेरिकेला निर्यात केल्या. अमेरिकेनें एकूण ८३ लाख पौंड वजनाच्या सतरंज्या आयात केल्या.

**BOMBAY PROVINCIAL CO-OPERATIVE INSTITUTE.**

Applications for the post of Assistant Superintendent principally for publicity work are invited from Graduates preferably with knowledge and experience of the Co-operative movement and of publicity work. The salary of the post is Rs. 150-10-250 with such Dearness Allowance as may be sanctioned from time to time.

Applications giving details regarding age, educational qualifications, regional languages known, practical experience in Co-operation and publicity etc, should be addressed to Shri V. P. Varde, Honorary Secretary, 9, Bakehouse Lane, Fort, BOMBAY 1, and should reach him on or before the 3rd June 1950.

—सर्व प्रांतांतील—
सुती-गरम-रेशमी
—खादीचें माहेरघर—
**खादी मन्दिर**
२६२, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

## लष्करी संरक्षण आणि औद्योगिक उत्पादन

( श्री. शंतनुराव किर्लोस्कर, अखिल भारतीय मेकॅनिकल इंजिनिअर्स परिषदेचे अध्यक्ष )

आपला देश आतां पूर्णपणें स्वतंत्र झाला असल्यानें आपण नव्या परिस्थितींत रहात आहोंत. कोणत्याही स्वतंत्र देशाला दोन कार्यें करावीं लागतात. एक अंतर्गत शांतता रक्षण करण्याचें आणि दुसरें परकीय आक्रमणापासून रक्षण करण्याचें. हीं दोन्हीं कार्यें पार पाडण्यासाठी अशा स्वतंत्र देशाचें संरक्षण खातें अगदीं शंभर टक्के स्वयंपूर्ण व स्वावलंबी असलें पाहिजे. भारताला कोणत्याही प्रकारची प्रादेशिक आकांक्षा नाहीं. परंतु परकीय आक्रमणापासून संरक्षण करावयाचें असेल तर तेवढ्यापुरता हिंसेचा आचार करण्याशिवाय गत्यंतरच नाहीं.

संरक्षणाचीं तीन प्रमुख अंगें आहेत. लष्कर, नाविक दल आणि विमानदल. ह्या तिन्ही बाबतींत आपली परिस्थिति कशी आहे याचा आपण विचार करूंया. ह्या दलांतून काम करणाऱ्या लोकांच्या गुणांबद्दल शंका घेण्याचें कारण नाहीं. कार्यक्षमता आणि दर्जा ह्या दोन बाबतींत कोठल्याही परराष्ट्राच्या सैनिकांशीं तुलना करतां येईल असेच हे लोक आहेत. परंतु संरक्षण दलांना जीं यांत्रिक साधनें पुरविलीं जातात, त्यांचा विचार केला तर आपण फारच मागें आहोंत. आतां तर अशी परिस्थिति आहेच; पण आणखी कांहीं वर्षें तीच कायम रहाणार असें दिसतें. ही आपत्ति टाळावयाची असेल तर आपण जागे होऊन आपली अर्थव्यवस्था आपल्या गरजेप्रमाणें योजनाबद्ध केली पाहिजे. आपल्या उद्योगधंद्यांची पुनर्घटना करून ते संरक्षण खात्याच्या दिमतीला दिले पाहिजेत. ब्रिटन आणि अमेरिका ह्यांच्यापासून लढाऊ बोटी, विमानें आणि चिलखती गाड्या आपण किती दिवस विकत घेणार? हीं सर्व संरक्षणाचीं साधनें आपण स्वतः बनविलीं पाहिजेत. त्यासाठी जरूर ते एंजिनिअर्स आपणांजवळ पाहिजेत.

ही परिषद् मेकॅनिकल एंजिनिअर्सची आहे ह्याची मला पूर्ण जाणीव आहे. तरी सुद्धा सर्व प्रकारच्या एंजिनिअर्सना उद्देशून मी बोलत आहे. मी जेव्हां एंजिनिअर असा शब्द वापरतो त्यावेळीं देशाच्या कारखान्यांत काम करणारे सर्व कामगारच माझ्या दृष्टीसमोर आहेत. हे कामगार, उद्योगपति आणि कारखानदार ह्या सर्वांनीं आपल्या देशाला आक्रमणापासून सुरक्षित ठेवण्याचें ध्येय व कर्तव्य नजरेसमोर ठेवलें पाहिजे. सरकारनेंही, मग तें कोणत्याही रंगाचें असो, ह्या ध्येयाच्या बाबतींत आग्रह धरला पाहिजे. कोणत्याही राजकारणी पुरुषाला ह्या मूलभूत ध्येयाच्या मार्गांत अडथळा आणण्याची मुभा असूं नये. येतीं कांहीं वर्षें राष्ट्रीय दृष्ट्या आणीबाणीचीं आहेत असें मानून, कोणत्याही बड्या राष्ट्राच्या लष्करी सामर्थ्याशीं तुलना करता येईल अशी लष्करी सिद्धता आपण केली पाहिजे. अशी सिद्धता करावयाची असेल तर परंपरागत नांगर आणि गाय ह्यांच्यावर आधारलेली अर्थव्यवस्था उपयोगी पडणार नाहीं. ही करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर औद्योगीकरण झालें पाहिजे. आज दोन हातांनीं काम करून जितकें उत्पादन होतें त्याच्या कितीतरी पट अधिक उत्पादन औद्योगिक शक्ती आणि कुशलता वापरून केलें पाहिजे. संरक्षणासाठी लागणारें उत्पादन आणि नागरी जीवनासाठी लागणारें उत्पादन ह्या दोन्हींत फारसा फरक नाहीं. शांतताकाळीं आणि युद्धाच्या काळीं, अशा दोन्ही अवस्थांत वापरतां येईल अशी उद्योगधंद्यांची पुनर्घटना करता येते. गेल्या महायुद्धांत हें बऱ्याच प्रमाणांत सिद्ध झालें आहे.

मी म्हणतों ही गोष्ट साध्य करणें सोपें नाहीं, ह्याची मला जाणीव आहे. कित्येक विद्वांत जें साध्य होत नाहीं तें थोड्या वर्षांत करण्याचा आग्रह मी धरीत आहे. पण हा प्रश्न फार महत्त्वाचा आहे. एका लढाऊ सैनिकासाठी १०० जणांना कारखान्यांत काम करावें लागतें. अमेरिकेंत एका लढाऊ योद्ध्यामागें ४० कामगारांना काम करावें लागतें. आपली औद्योगिक कार्यक्षमता कमी असल्यानें आपल्याला दर सैनिकामागें निदान १०० माणसें तरी त्याला लागणाऱ्या उत्पादनाच्या कामांत गुंतवावीं लागतील. म्हणजे आपल्या देशांत कोट्यवधि कामगारांची जरूरी लागेल आणि त्या हिशेबानें आपले उद्योगधंदे १० ते १५ पट वाढवावे लागतील. नाहींतर आपले सैनिक तोफा-बंदुकांचें केवळ भक्ष्य बनतील.

### ओगले ग्लास वर्क्स लि., ओगलेवाडी

वरील कंपनीनें ३१ डिसेंबर, १९४९ अखेरच्या वर्षी २४,९७,८३१ रुपयांची विक्री करून ५,२४,१८० रु. अव्वल नफा मिळविला. १,४१,२८१ रु. घसारा काढून व ऑफिस आणि इतर खर्च करून ५५,७४२ रु. निव्वळ नफा ताळेबंदाकडे घेण्यांत आला. रिपोर्टाचे वर्षी नफा बराच कमी झाला, ह्याचें कारण कंपनी तयार करीत असलेल्या मालाच्या किंमती अपेक्षेबाहेर उतरल्या, हें होय. कारखान्यांत तयार होणाऱ्या मालाच्या उत्पादनांत वाढ करण्याचें ध्येय चालकांचे समोर असल्यानें व त्यासाठी खेळत्या भांडवलाची आवश्यकता असल्यानें, डिव्हिडंड ई. फंडांतून नफा वाटणीसाठी रकमा न काढतां त्या फंडांतच भर घालण्याचें धोरण डायरेक्टर बोर्डानें पत्करलें आहे हें अगदीं योग्य आहे. रिपोर्टाचें वर्ष कंपनीस फारच कठिण गेलें तरी कंपनीची परिस्थिति भक्कम असल्यानें, १९५० हें वर्ष गतवर्षापेक्षा चांगलें जाईल अशी अपेक्षा आहे. कारखान्याचे संस्थापक व मॅ. एजन्सीचे वरिष्ठ भागीदार श्री. श्री. प्र. ओगले हे वृत्तांतवर्षी दिवंगत झाले. त्यामुळें झालेल्या नुकसानीचा योग्य शब्दांत उल्लेख डायरेक्टरांचे रिपोर्टांत करण्यांत आला आहे. वार्षिक सभा ता. ४ जून रोजीं भरणार आहे. ( चेअरमनः श्री. जगन्नाथ महाराज पंडित. मॅ. एजंटसः एस. पी. ओगले आणि कं.)

### औद्योगिक कामगारांची संख्या वाढली

भारतांतील औद्योगिक कामगारांची संख्या वाढत आहे, हें एक चांगलें लक्षण आहे. १९३९ सालीं औद्योगिक कामगारांची संख्या ९,७५,६५६ होती, ती १९४८ अखेर १४,९९,६४८ झाली. मुंबईमधील कामगारांची सरासरी वार्षिक प्राप्ति सर्वांत जास्त म्हणजे १,१२५ रु. होती. १९४७ मध्यें ती ९७८ रु. होती. सर्वच राज्यांतील ही प्राप्ति वाढली आहे. मुंबई राज्यांत इतर कोणत्याहि राज्यापेक्षां अधिक कामगार होते. त्यांची संख्या ७,३७,४६० होती. त्याचेनंतर मद्रास ( २,८८,७२२ ) व उत्तरप्रदेश ( २,४२,०८३ ) हे येतात.

### पेनिसिलिनचा तुटवडा कां पडला ?

"ग्रेट ब्रिटनमधून पेनिसिलिन मागविण्याचा अधिकार थोड्याशा व्यापाऱ्यांसच देण्यांत आला आणि अमेरिकेंतून पेनिसिलिन मागविण्यास बंदी करण्यांत आली. वास्तविक, ग्रेट ब्रिटनमध्यें पेनिसिलिनच्या उत्पादनास नुकताच प्रारंभ झाला आहे. परंतु, तेथील कारखानदार भारतांत अमेरिकन पेनिसिलिन येऊं नये, अशी कारवाई करूं शकले. ह्या देशाची मागणी पुरविण्यास ब्रिटिश कारखानदार वास्तविक असमर्थ आहेत." मुंबई येथील औषध विक्रेत्यांच्या परिषदेचे अध्यक्ष, श्री. उपाध्याय, ह्यांनीं पेनिसिलिनच्या तुटवड्याची वरीलप्रमाणें कारणमीमांसा केली आहे.

## बेकारी टाळण्यासाठी आंतरराष्ट्रीय मजुरसंघटनेनें सुचविलेली उपाययोजना व हिंदमधील परिस्थिति

( मा. म. काळे. )

निरनिराळ्या ६० राष्ट्रांच्या कामगार, मालक व सरकार या नियामांनीहि नेमलेल्या तज्ज्ञ अर्थशास्त्रज्ञांनी जागतिक बेकारी टाळण्यासाठी उपाययोजना सुचविली आहे व तिची चर्चा ७ जून पासून सुरू होणाऱ्या जिनेव्हा येथील परिषदेंत करण्यांत येणार आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या उपायांनी आर्थिक मंदी टाळतां येईल असें त्यांनी प्रथम सुचविलें आहे. बेकारी व गरजी-पेक्षां कमी लोकांना कामधंदा मिळणें या गोष्टी आजच्या काळांतील सामाजिक दुश्चिन्ह होत.

१९४९ च्या परिस्थितीचा विचार करतांना असें दिसून येतें कीं, बेल्जममधील बेकारीचें कारण विक्री मालाच्या बाबतींतील अडचणी व निर्गतीच्या बाबतींतील अडचणी होत. जर्मनीच्या एका भागांत निर्वासितांच्या मोठ्या प्रमाणांत झालेल्या आयाती-मुळें बेकारी निर्माण झाली. इटालीच्या दक्षिण भागामध्यें उद्योगधंदा मिळवून देणाऱ्या साधनांची अपुरी वाढ हें बेकारीचें मुख्य कारण आहे. यासाठीं भांडवल उपलब्ध झालें पाहिजे. अमेरिकन संयुक्त संस्थानांतील बेकारीचें मुख्य कारण म्हणजे अमेरिकेच्या मालाची जागतिक बाजारपेठेंत झालेली कमी प्रमाणांत विक्री हें होय. औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या देशांत थोडीशी बेकारी दिसून येत आहे; व औद्योगिक दृष्ट्या जे देश मागासलेले आहेत तेथें तर बेकारी ज्यास्त प्रमाणांत आढळून येत आहे.

ही परिस्थिति लक्षांत घेऊन अर्थशास्त्रज्ञांची अशी सूचना आहे कीं यापुढें अशी परिस्थिति निर्माण झाली पाहिजे कीं कोणत्याहि देशांतील नागरिकाला आपला दोष नसतांना आपली नोकरी सुटेल किंवा आपल्या कामधंद्यापासून आपणाला दूर जावें लागेल अशी भीति केव्हांहि वाटतां कामा नये अशी परिस्थिति प्रत्येक देशांत निर्माण झाली पाहिजे. महायुद्धामध्यें झालेल्या नाशामुळें झालेलें नुकसान भरून काढण्यासाठी कांहीं देशांत बेसुमार खर्च करून कांहीं उद्योगधंदे चालू आहेत. परंतु ही परिस्थिति कायम टिकणारी नव्हे,कारण योग्य ती निर्मिती झाल्यावर पुष्कळ लोकांना बेकार व्हावें लागेल. कच्चा माल व सर्पण यांसाठी ज्या देशांना इतर देशांवर अवलंबून राहावें लागतें त्यांची परिस्थिति त्यांना स्वतःला निर्गत किती प्रमाणांत करतां येईल यावर अवलंबून राहील. या दृष्टीनें बेकारीचा विमा उतरण्याची पद्धति सर्व देशांत रूढ झाली पाहिजे. प्रत्येक देशाच्या सरकाराला सर्व लोकांना काम मिळवून देण्याच्या दृष्टीनें कांहीं गोष्टी करतां येण्यासारख्या आहेत. उद्योगधंद्यांना कर्जाऊ रकमा मिळण्याची सोय, व्याजाचा माफक दर, उद्योगधंद्यांना उत्तेजन देणारी कर-पद्धति, औद्योगिक संशोधनाला मदत, नवीन उद्योगधंद्यांचा विकास, इ. प्रकारच्या गोष्टी प्रत्येक देशांतील सरकारला कांहीं प्रमाणांत करतां येण्यासारख्या आहेत. सरकारनें दीर्घकालीन योजनां-प्रमाणेंच प्रथम त्वरित उत्पादन वाढविणाऱ्या धंद्यांकडे जास्त लक्ष दिलें तर बेकारी नाहींशी होण्याला मदत होईल. बेकारी टाळण्यासाठीं सार्वजनिक स्वरूपाच्या कामांचा कार्यक्रम सरकारनें निश्चित करावा. औद्योगिक पक्क्या मालाचा साठा देशांत किती आहे व त्याला संभाव्य मागणी किती आहे याची नीट पाहणी करून अंदाज प्रत्येक सरकारला बांधता आला पाहिजे. म्हणजे बेकारी टाळण्याच्या दृष्टीनें सरकारला लक्ष पुरवितां येईल. पडित जमिनी लागवडीस आणून व नवीन उद्योगधंदे काढण्यास भांडवलाचा व यंत्रज्ञांचा पुरवठा करून मागासलेल्या देशांतील बेकारी टाळतां येईल व त्याचबरोबर संपत्तीच्या उत्पादनांत भर पडेल. देशांतील जनतेनें शिल्लक टाकावी या दृष्टीनें सरकारनें विशेष प्रयत्न केले पाहिजेत, व ही शिल्लक उत्पादक धंद्यांमध्यें गुंतविली गेली पाहिजे. परराष्ट्रीय भांडवल देशांत येईल या दृष्टीनें प्रयत्न केले पाहिजेत. प्रत्येक देशांत सरकारनें तरुणांना योग्य प्रकारचें औद्योगिक शिक्षण देण्याची तरतूद केली पाहिजे. ज्या विभागांत गरजेपेक्षां जास्त मजूरवर्ग असेल अशाच ठिकाणीं नवीन उद्योगधंदे स्थापन करावे. एखाद्या हंगामांत निर्माण होणारी तात्पुरती बेकारी टाळण्यासाठीं सरकारनें खेडेगावांत उद्योगधंदे सुरू करावे, सार्वजनिक कामें सुरू करावी व संमिश्र शेती रूढ करावी.

आंतरराष्ट्रीय दृष्टीनें विचार करतां अर्थशास्त्रज्ञांचें म्हणणें: असें कीं जागतिक व्यापाराची सारखी वाढ होत गेली पाहिजे. जगांतील प्रमुख देशांचें चलन इतर सर्व देशांना नेहमीं स्थिर भावांत मिळण्याची व्यवस्था झाली पाहिजे. त्याचप्रमाणें जगांतील मुख्य प्राथमिक मालाचे बाजारभावहि स्थिर राहिले पाहिजेत. प्रत्येक देशाच्या सरकारनें इतर देशांशीं विचारविनिमय करून आपल्या देशांत कोणीहि बेकार राहाणार नाहीं अशी योजना आखली पाहिजे. गरजू राष्ट्रांना बेकारी टाळण्यासाठी पुढारलेलीं राष्ट्रें दीर्घ मुदतीनें भांडवलाचा पुरवठा करून, मागासलेल्या देशांना धंद्यां-तील विशिष्ट तांत्रिक ज्ञान पुरवून व आंतरराष्ट्रीय लोकसंख्येच्या हालचालीला अवसर देउन मदत करूं शकतील.

### हिंदमधील परिस्थिति

हिंदमध्येंहि गेल्या वर्षापासून बेकारीची झळ जाणवूं लागली आहे. एम्प्लॉयमेंट एक्सचेंजमुळें बेकारांना नोकऱ्या मिळण्याला मदत होते, परंतु त्यामुळें नवीन नोकऱ्या निर्माण होऊं शकत नाहींत. विशेषतः गेले १८ महिने सरकारचें लक्ष आर्थिक प्रश्नांकडे वास्तवतेच्या दृष्टीनें वळलें आहे. व त्याचा परिणाम म्हणून परराष्ट्रीय व्यापारांतील प्रतिकूल तफावत दूर करण्यासाठीं विशेष प्रयत्न केले जात आहेत, धान्याच्या बाबतींत स्वयंपूर्ण बनण्याचा प्रयत्न केला जात आहे, रुपयाच्या अवमूल्यनानंतर वास्तवतेचें धोरण स्वीकारलें गेलें व वस्तूंचे बाजारभाव स्थिर पातळीवर येत आहेत. बेकारी टाळण्यासाठीं उद्योगधंद्यांची वाढ झाली पाहिजे, परंतु या बाबतींतल्या मुख्य अडचणी म्हणजे भांडवलाचा तुटवडा व यंत्रज्ञांचा अभाव या आहेत. या अडच-णींकडे सरकारचें लक्ष गेलेलें आहे, परंतु यांचें स्वरूपच असें आहे कीं त्या सावकाशच दूर होऊं शकतील. गेल्या दोन शतकांत इंग्लंडनें ज्याप्रमाणें अमेरिका, आस्ट्रेलिया, आफ्रिका या देशांत वसाहती करून बेकारीचा प्रश्न सोडविला त्याप्रमाणें हिंदला आज कोणत्याहि परदेशचा मार्ग मोकळा नाहीं तेव्हां अंतर्गत प्रयत्नांनींच हिंदला बेकारीचा प्रश्न सोडविला पाहिजे. सरकारचें व कारखान-दारांचें या प्रश्नाकडे लक्ष गेलें आहे, ही गोष्ट आशाजनक आहे.

---

चीन-रशिआमधील नवीन रेल्वे रस्ता—वायव्य चीनमधील लॅनचौ हें ठिकाण देशांतील पूर्व-पश्चिम रेल्वे रस्त्याशीं जोडणाऱ्या एका रेल्वे-रस्त्याचें काम सुरू करण्यांत आलें आहे. ह्या रस्त्याची लांबी १५० मैल होईल. हाच रस्ता पश्चिमेकडील सिंकिॲंग प्रांतांत वाढविण्यांत आला कीं रशिअन रेल्वे रस्त्याशीं चीनची रेल्वे जोडली जाईल. नवीन रेल्वे रस्त्यावर २५,००० चिनी सैनिक खपत आहेत.

## बँकेच्या वायंडिंग-अपसाठी अर्ज

### डिस्ट्रिक्ट कोर्टास अधिकार आहे काय? : फॉरच्युन बँकेचें अपील

दि फॉरच्युन कमर्शिअल बँक लि., जळगांव ह्या बँकेची स्थापना १९४५ सालीं झाली. तिचें अधिकृत भांडवल १० लक्ष रुपये व वसूल भांडवल २½ लक्ष रुपये होतें. १९४९ सालीं श्री. एस. बी. गुप्ता, जे. पी. शेट व व श्रीमती मेहता ह्यांनीं पूर्व खानदेशच्या डिस्ट्रिक्ट जज्जांकडे अर्ज करून, तेव्हांच्या मॅनेजिंग डायरेक्टरानें बँकेचा कारभार अत्यंत अव्यवस्थितपणें चालविला आहे ह्यासाठी बँक गुंडाळण्यांत यावी अशी मागणी केली. डिस्ट्रिक्ट जज्जानें त्याप्रमाणें हुकूम देऊन दोन लिक्विडेटर नेमले. ३० मार्च, १९५० रोजीं बँकेची विशेष साधारण सभा झाली, तेव्हां बँकेचें लिक्विडेशनमध्यें जाणें थांबविण्याचा प्रयत्न करण्यांत यावा असा भागीदारांनीं ठराव केला. बँकेतर्फे त्याप्रमाणें हायकोर्टांत अर्ज करण्यांत आला. डिस्ट्रिक्ट जज्जाचा हुकूम चुकीचा व बेकायदा आहे, असें बँकेतर्फे सांगण्यांत आलें. "बँकेच्या वायंडिंग-अपसाठीं केलेला अर्ज विचारांत घेण्याचा डिस्ट्रिक्ट जज्जास अधिकारच नाहीं, बँकिंग कायद्यानें तो हायकोर्टास दिलेला आहे. तेव्हां खालच्या कोर्टांतील सर्व काम बेकायदा झालेलें आहे. बहुसंख्य भागीदारांची इच्छा विचारांत घेण्यांत आली नाहीं. लिक्विडेटर्स नेमतांनाहि त्यांना विचारलें नाहीं. सक्तीच्या वायंडिंग-अपमुळें भागीदार व देणेकरी ह्यांचें प्रचंड नुकसान होईल" असे बँकेतर्फे मुद्दे मांडण्यांत आले व डिस्ट्रिक्ट जज्जाचा हुकूम न पाळण्याचा आदेश लिक्विडेटरना देण्यांत यावा अशी हायकोर्टास विनंति करण्यांत आली. हायकोर्टानें अपीलाचा निकाल लागेपर्यंत तात्पुरती 'स्टे ऑर्डर' दिली.

---

## शेतकरी कर्जनिवारण कायदा

### ॲवॉर्डचें रजिस्ट्रेशन करण्याबाबतची कार्यपद्धति

मुंबई सरकारनें १९४७ च्या मुंबई शेतकरी कर्जनिवारणाबाबतच्या नियमांत दुरुस्ती केली असून याबाबतचें आवश्यक नोटिफिकेशन मुंबई सरकारच्या ता. १ एप्रिल १९५० च्या गॅझेटमध्यें प्रसिद्ध झालें आहे. दुरुस्त नियमानुसार ऋणकोची स्थावर व जंगम मालमत्ता अजमावण्याच्या दृष्टीनें चौकशी करण्यासाठी सरकारनें नेमलेल्या "लोन व्हॅल्युएशन ऑफिसरांची" कोर्टामार्फत कमिशनर म्हणून नेमणूक करतां येईल. कोणत्या बाबतींत पीक लागवडीसाठीं कर्जें देतां येतील हेंहि या नियमांत नमूद करण्यांत आलें आहे १९४७ च्या मुंबई शेतकरी कर्जनिवारण कायद्याखालील ॲवॉर्डचें रजिस्ट्रेशन करण्याच्या बाबतींत सरकारनें असें ठरविलें आहे कीं, ॲवॉर्ड रजिस्ट्रेशनसाठी पाठविणें हें कोर्टाचेंच कर्तव्य आहे आणि या कायद्याच्या प्रकरण २ अ अनुसार ॲवॉर्ड रजिस्ट्रेशनसाठीं सादर करण्याची जबाबदारी संबंधित पक्षावर टाकलली नाहीं. त्याचप्रमाणें या कायद्याखालील ॲवॉर्डास अथवा त्याच्या सर्टिफाइड प्रतीस १९०८ च्या इंडियन रजिस्ट्रेशन ॲक्टखाली रजिस्ट्रेशन फीच्या बाबतींत सूट देण्यांत आली आहे, असाहि सरकारनें आदेश दिला आहे.

---

### पुणें सें. को. बँकेची पौड शाखा

पुणें सेंट्रल को. बँकेच्या पौड यथील नव्या शाखेचा उद्घाटन समारंभ बुधवार दि. ३१ मे १९५० रोजीं दुपारीं ४ वाजतां श्री. भालचंद्र महेश्वर गभे, एम्. ए., एलएल. बी., ह्यांच्या हस्तें होणार आहे. बँकेच्या पौड शाखेचा पत्ता "श्री. बहुलकरांचा वाडा, पौड," असा आहे.


## B. M. College of Commerce, Poona.

The College will open for the new year on 20th June 1950. Prospectus will be sent on receipt of four annas. Fee to be paid at the time of admission is Rs. 122/- for the first term. Applications for admission with a deposit of Rs. 10 (Rs. 20/- for hostel accommodation) should be made immediately after the result of the qualifying examination.

PRINCIPAL.

## महाराष्ट्र सहकारी विद्यालय

### पुणें

या विद्यालयाचे वर्ग ता. १ जुलै १९५० पासून नं ५ वेरामजी जीजीभाई रोड, पुणें १ येथें सुरू होणार आहेत. या विद्यालयांत सुपरवायझर, बँक इन्स्पेक्टर, असि. को. ऑफिसर, खरेदी विक्री संघाचे मॅनेजर व विविध कार्यकारी सोसायट्यांचे सेक्रेटरी या दर्जाच्या नोकरवर्गास लागणारें शिक्षण देण्यांत येतें. हा अभ्यासक्रम पुरा करून 'को-ऑपरेटिव्ह डिप्लोमा' मिळविणाऱ्यांना सहकारी खात्यामध्यें नोकरीसाठी विशेष पसंती देण्यांत येते. मॅट्रिक पास झालेल्या विद्यार्थ्यांना व सहकारी संस्था व खातें येथील नोकरवर्गास प्रवेश दिला जातो. उमेदवारांनीं ता. २५ जून १९५० च्या आंत अर्ज करावे.

बा. वि. कुंभारे,
सुपरिन्टेन्डेन्ट.

संपूर्ण कोर्सला कायमची सरकारी मान्यता मिळालेलें

## आयुर्वेद महाविद्यालय, पुणें नं. २.

सुटी नंतर दि. १९ जून १९५० रोजीं सुरू होईल. इंग्रजी व संस्कृत घेऊन एस्. एस्. सी. व संस्कृत घेऊन मॅट्रिक अगर तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेल्यासच प्रवेश मिळेल. प्रयोगशाळा, शवच्छेदन शाळा, आयुर्वेद रसशाळा, शेठ ताराचंद रामनाथ हॉस्पिटल व सूतिकागृह वगैरे प्रत्यक्ष शिक्षणाच्या सोयींनीं युक्त. फी, शिष्यवृत्त्या, नादाऱ्या, वसतिगृह इत्यादिबद्दल माहितीकरितां तीन आण्याचीं तिकिटें पाठवून माहितीपत्रक मागवा. महाविद्यालयाशेजारीं विद्यार्थिनींसाठीं स्वतंत्र वसतिगृह बांधलेलें आहे. प्रथम वर्षांत फक्त ५० विद्यार्थी घ्यावयाचे आहेत व १० जूनपर्यंत आलेल्या अर्जांतून त्यांची निवड केली जाईल.

पदवीधर वैद्यांसाठीं 'आयुर्विद्या पारंगत' परीक्षेच्या दोन वर्षांच्या अभ्यासक्रमाची व्यवस्था करण्यांत आली आहे.

आयुर्वेद महाविद्यालय,
२२ नागेश पेठ, पुणें २.

भा. वि. गोखले,
अधिपति.

## गिरण्यांचे चेअरमन काय म्हणतात ?

### कापडाची किंमत वाढवून द्या

"कपाशीचें पीक कमी आल्यामुळें आणि पाकिस्तानची पुरवठा अजिबात बंद पडल्यामुळें, सरकारनें ठरवून दिलेल्या कमाल किंमतीस कोणत्याच गिरणीस कच्चा माल मिळूं शकलेला नाहीं. आर्थिक स्वास्थ्यासाठी उत्पादन चालू ठेवण्याचा मात्र सरकारचा आग्रह होता. नियंत्रित किंमतीस कपास पुरविण्याबाबत सरकारकडे गिरण्यांनीं मागणी केली, परंतु सरकार कांहीं करूं शकलें नाहीं. सहाजीकच, नियंत्रित दरापेक्षा पुष्कळच भारी दरानें कपास घेणें गिरण्यांना भाग पडलें. ह्या महाग कपाशीचें कापडांत रूपांतर होऊं लागलें असल्यानें, चालू दरानें कापड विकण्यांत गिरण्यांचा निश्चित तोटा आहे. ज्या प्रमाणांत गिरण्यांना कपाशीसाठी जादा किंमत द्यावी लागते त्या प्रमाणांत कापडाचे भाव सरकारनें वाढवून दिले नाहींत, तर येत्या कांहीं महिन्यांत कित्येक गिरण्यांना उत्पादन बंद करणें भाग पडेल."

स्वदेशी मिल्स कं. लि.　　　　प. डी. श्रॉफ

### यंत्रसामुग्री बदलणें अगत्याचें झालें आहे

"गिरणींतील बहुतेक यंत्रसामुग्री जुनीपुराणी झाली आहे आणि आपला स्वतंत्र टिकाव लागावयाचा असेल, तर नवी यंत्रसामुग्री बसविणें जरूर आहे. त्यासाठी आज बाजारांत नवे शेअर भांडवल विक्रीस काढण्याजोगी बाजाराची परिस्थिति नसली, तरी ह्या नव्या सामुग्रीसाठी पैसा कोठून तरी उपलब्ध केलाच पाहिजे गिरणी, विशेषतः स्पिनिंग खातें, किफायतशीर चालविणें आज कठीण झालें आहे. कारण, स्पिनिंग फ्रेम्स अगदी जुन्या पद्धतीच्या आहेत एवढेंच नव्हे तर त्यांत चात्या कमी असल्यानें आजच्या मजुरीच्या कोष्टकाप्रमाणें त्यावर ज्यास्त मजुरी पडते."

टाटा मिल्स लि.　　　　एन. एच. टाटा

### कृषिसंस्थांनी योग्य भाव मिळवून दिला पाहिजे

"आपल्या प्रांतांतील कृषि संस्थांनी ह्यापुढें पिकांना बाजारांत योग्य भाव मिळवून देण्याची योजना निर्धारानें आखावी असें मला आग्रहानें सुचवावेसें वाटतें. हा कार्यक्रम योग्य रीत्या आखला गेल्यास, 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया' सारख्या संस्थेचें त्यासाठीं आर्थिक सहाय्य लाभूं शकेल. ह्या दृष्टीने अधिकारवंतांचें लक्ष केंद्रित होणें जरूर आहे. अशा प्रकारच्या उपक्रमास रिझर्व्ह बँकेकडून आर्थिक सहाय्य मिळत असतें, अशी माझी माहिती आहे. ह्या संधीचा जास्तींत जास्त उपयोग करून घेतला पाहिजे. प्रांतिक मार्केटिंग सोसायटीलाहि ह्या बाबतींत बरेंच कार्य करतां येण्यासारखें आहे. ही गोष्ट घडून आल्यास, आपल्या प्रांतांतील सहकारी संस्थांची आर्थिक उणीव अंशतः भरून काढतां येईल.":—सर माधवरावजी देशपांडे, के. बी. ई. यांनीं सी. पी. अँड बेरार प्रॉव्हिन्शिअल कोऑपरेटिव्ह बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळीं काढलेले उद्गार.

### टी सेस मध्यें वाढ

भारत सरकारनें चहाच्या निर्गतवरील पट्टी ६ आण्यांनीं वाढविली आहे. म्हणजे, पूर्वी ती १०० पौंडांस १ रु. १० आ. होती, ती २ रु. करण्यांत आली आहे.

### गव्हर्मेंट क्लार्क्स हौसिंग को. सोसायटी, नागपूर

आपल्या सभासदांसाठी रहाण्याचीं घरें उपलब्ध करून देणें हा ह्या सोसायटीचा उद्देश आहे. सोसायटी पुष्कळ जुनी असली तरी तिचा व्यवहार स्थगित झाला होता आणि ती लिक्विडेशनमध्यें जाण्याच्या मार्गांत होती. १९४८ मध्यें श्री. जी. टी. काळे, एम. एन. बनसोडे, बी. एल. जोशी, एम. एस. नेने, विंझे आणि एन. एस. श्रीखंडे ह्यांनीं सूत्रें हातीं घेतलीं. त्यांच्या प्रयत्नांमुळें ४८ नवे सभासद झाले. नागपूर इं. ट्रस्टकडून सोसायटीनें नागरच्या लॉ कॉलेजसमोर ३२ प्लॉट सवलतीच्या दरानें मिळवले आहेत. ट्रस्टनें लोखंड, सिमेंट, इत्यादि देण्याचेंहि मान्य केलें आहे. नागपूर इं. ट्रस्ट व मध्यराज्य सरकार ह्यांच्या मदतीनें घर बांधणीस लवकरच प्रारंभ होईल, अशी अपेक्षा आहे. सोसायटीचे चेअरमन श्री. जी. टी. काळे ह्यांच्या सहकारी दीर्घ अनुभवाचा सोसायटीस फायदा मिळत आहे. श्री. एम. एस. नेने हे सेक्रेटरी व श्री. आर. आर. कन्हई हे जॉ. सेक्रेटरी आहेत. श्री. एन. एस. श्रीखंडे ह्यांची ट्रेझरर म्हणून निवडणूक झालेली आहे.

### हिंदी मालाबाबत मलायाची तक्रार

सिंगापूर इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सचे मावळते अध्यक्ष, सरदार हरदयालसिंग, ह्यांनीं आपल्या भाषणांत हिंदी कापडाची मलायामध्यें जी निर्गत होते, तिचे विषयीं काढलेले उद्गार उद्बोधक आहेत. कापडाचा रंग, वीण, पॅकिंग, इत्यादींविषयीं त्यांनीं तक्रार केली. करार पाळणें नुकसानकारक होऊं लागलें कीं तो टाळण्याची हिंदी व्यापाऱ्यांची प्रवृत्ति कशी अनिष्ट आहे, हेंहि त्यांनीं सांगितलें. हे व्यापारी हिलिव्हरीच्या तारखाहि पाळीत नाहींत. मलायाची हिंदी मालाची आयात पुष्कळच वाढली आहे, ह्या दृष्टीनें सरदार साहेबांच्या तक्रारीस महत्त्व आहे.

### पाकिस्तानची इं. फि कॉर्पोरेशन

५० लक्ष रुपये भांडवलाची एक इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन पाकिस्तानांत स्थापन करण्यांत येणार आहे.

**भारतांतील कागदाचें उत्पादन**—भारतांतील १९ कागदाच्या गिरण्यांनीं १,००,००० टन कागद १९४९ सालीं निर्माण केला. १९४८ सालापेक्षां हें उत्पादन ८ टक्क्यांनीं अधिक आहे. भारतांत वृत्तपत्रांना लागणारा कागद तयार होत नाहीं. मध्यप्रांतांत अशा कागदाचा एक कारखाना उभारण्यांत येत आहे. भारताला दरवर्षी ५५,००० टन कागद कानडांतून आयात करावा लागतो. १९४९ सालीं देशांत जितक्या कागदाची गरज होती त्याच्या निमपटीनें कागद उत्पादन करण्यांत आला.

**प्लॅस्टिकमुळें त्वचा रोग होत नाहींत**—ऑल इंडिया प्लॅस्टिक मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशननें प्लॅस्टिकच्या जिनसा वापरल्यानें कातडीचे रोग होतात किंवा काय ह्यासंबंधीं तपास करण्यासाठी तज्ज्ञांची एक कमिटी नेमली होती. कमिटीनें ह्या प्रश्नाचा अभ्यास करून ह्या वस्तूंपासून कसलाहि अपाय होत नाहीं असा निर्वाळा दिला आहे.

**पाकिस्तानची विमान-वहातुक कंपनी**—१९५१ च्या जानेवारी महिन्यापासून पाकिस्तान सरकार एक बिन सरकारी हवाई-वहातुक कंपनी स्थापन करणार आहे असें समजतें. ही कंपनी मध्यपूर्व व अतिपूर्वेकडील शहरांशीं दळणवळण करील. पाकिस्तान सरकार भांडवलापैकीं ५१ टक्के भांडवल घालणार आहे.

### कारखान्यांतील कँटीन्स

ग्रेटब्रिटनमधील कारखान्यांच्या कँटीन्सची लोकप्रियता गेल्या दहा वर्षांत फारच वाढली आहे. १९३९ मध्यें सुमारें १,५०० कँटीन्स चालू होतीं; आतां त्यांची संख्या २८,००० झाली असून त्यांत दर आठवड्यास सुमारें १½ कोटी जेवणें होतात. त्यांतील इतर फराळांची संख्या ५½ कोटीवर जाते. युद्धकाळांत, कामगारांची सोय करण्यासाठीं २५० पेक्षा ज्यास्त कामगार असणाऱ्या कारखान्यांवर कँटीन्स उघडण्याची सक्ति करण्याचा अधिकार सरकारनें स्वत:कडे घेतला. परंतु, कारखान्यांनीं आपण होऊन कँटीन्स उघडण्याची चढाओढच सुरू केली. कामगार काम शोधतांना आतां कारखान्यांतील कँटीनमधील जेवणाविषयीं चौकशी करतो. कँटीन्समुळें गैरहजेरीचें प्रमाण उतरतें व कामगारांशीं संबंधहि ज्यास्त सलोख्याचे रहातात. परंतु, केवळ जमाखर्चाच्या दृष्टीनें कँटीन्स कारखानदारास नुकसानकारकच वाटतात.

---

### सीलोनमध्यें साखरेचे कारखाने

सीलोन सरकारनें आपल्या देशांत साखरेचा धंदा उभारण्याची शक्यता अजमावण्यासाठीं प्रो. डी. जी. वालावलकर ह्या हिंदी तज्ज्ञाला पाचारण केलें होतें. प्रो. वालावलकरांनीं आपला अहवाल आतां सीलोन सरकारला सादर केला आहे. सीलोनमध्यें १० कोटी रु. भांडवल घालून १७ साखरेचे कारखाने काढावे असा सल्ला त्यांनीं अहवालांत दिला आहे. सीलोनमध्ये उसाची लागवड मोठ्या प्रमाणावर करतां येईल कीं नाहीं ह्याबद्दलही त्यांनीं त्या बेटाची तपशीलवार पहाणी केली आहे. साखरेचे कारखाने उभारण्यांसाठीं सीलोनला फार भांडवली खर्च करावा लागेल असा इषारा त्यांनीं दिला आहे. तथापि, सीलोनला साखरेच्या आयातीवर सध्या बराच खर्च करावा लागत आहे; ह्याही गोष्टीकडे त्यांनीं सरकारचें लक्ष वेधलें आहे. गेल्या वर्षी सीलोननें १,१६,४५६ टन साखर आयात केली व तीसाठीं ४,७४,२९,३९७ रुपये द्यावे लागले. वाढत्या लोकसंख्येबरोबर साखरेच्या आयातीवर होणारा हा खर्च वाढतच जाणार असल्यानें सीलोनच्या सरकारनें आपला देश साखरेच्या बाबतींत स्वयंपूर्ण करावा असा सल्ला त्यांनीं दिला आहे. हिंदुस्थानांत साखरेचे कारखाने मुख्यत: उत्तर हिंदुस्थानांत केंद्रित झाले आहेत. तथापि, अनुकूल हवामानाच्या दृष्टीनें मद्रास आणि मुंबई प्रांतांत साखरेचे कारखाने काढणें अधिक योग्य आहे. मद्रास प्रांत आणि सीलोन हवामानाच्या दृष्टीनें जवळ जवळ सारखेच असल्यानें सीलोनमध्यें उसापासून साखर करतां येईल.

---


### साखरेचें उत्पादन आणि सांठा

भारतांतील मध्यवर्ती १२८ साखर कारखान्यांत १५ एप्रिल १९५० रोजीं संपलेल्या पंधरवड्यांत साखरेचा सुरवातीचा सांठा, उत्पादन, रवानगी आणि शिलकी सांठा अनुक्रमें १,४९,५६,००० मण, ९,९३,००० मण, ९,५६,००० मण आणि १,४९,९३,००० मण होता. मागील हंगामांतील याच पंधरवड्यांतील प्रस्तुतचे आंकडे अनुक्रमें १,४३,१२,००० मण, १६,६६,००० मण, १६,१२,००० मण आणि १,४३,६६,००० मण असे होते. १ नोव्हेंबर, १९४९ पासून साखरेचें एकंदर उत्पादन आणि रवानगी अनुक्रमें २,५७,३४,००० मण आणि १,०९,७८,००० मण इतकी झाली. मागील हंगामांतील हेच आंकडे अनुक्रमें २,४४,९१,००० मण आणि १,५५,८४,००० मण असे होते.





'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार




दि व्हल्कन इन्शुअरन्स कं लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.